# दैनिक लोकांकीत

**सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र**

मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ • अंक-१०१ • दैनिक • पाने ४ पान १ किंमत २ रु. ( ई पेपर)


### आरोप करणारे पराभवाची मानसिकता बाळगून

**मुंबई**–शेलार यांनी पुढे सांगितले की, निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असून, तिच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणं म्हणजे लोकशाहीच्या मूलभूत चौकटीवरच आघात करणं आहे. आयोगाने ठरवलेल्या प्रक्रियेनुसार मतदान सुरू आहे, आणि त्यात त्रुटी असल्यास कायदेशीर मार्गाने त्यावर कारवाई करता येते. मात्र, सतत संशयाचं वातावरण तयार करून निवडणुकीचा विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न केल्यास तो सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. निवडणूक आयोगावर आरोप करणारे स्वतःच निवडणुकीत पराभवाची मानसिकता बाळगून असल्याचा आरोप त्यांनी अप्रत्यक्षपणे केला.

### मतदार नेमका कोणाच्या बाजूने

**मुंबई**–मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकीकडे बोगस मतदान, शाई पुसली जाणे आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयांवरून वाद सुरू असताना, दुसरीकडे सत्ताधारी आणि विरोधकांमधील शाब्दिक संघर्ष अधिकच तीव्र होत चालला आहे. आशिष शेलार यांच्या या आक्रमक वक्तव्यांमुळे ठाकरे बंधूंवरचा राजकीय दबाव वाढण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत आरोप-प्रत्यारोपांच्या या लढाईत मतदार नेमका कोणाच्या बाजूने झुकतो, हे निकालाच्या दिवशीच स्पष्ट होणार आहे. मात्र, सध्या तरी शेलार यांच्या टीकेमुळे मुंबईचं राजकारण पुन्हा एकदा पेटल्याचं चित्र आहे.

# ठाणे-मुंबईत वाढता मतदानाचा टक्का लोकशाही उत्सवात नागरिकांचा सहभाग

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुटुंबासह बजावला मतदानाचा हक्क

**ठाणे । प्रतिनिधी**

राज्यभरात आज महापालिकांच्या निवडणुकांसाठी शांततेत आणि उत्साहात मतदान सुरू आहे. ठाण्यात कुटुंबासह मतदान केल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधत सर्व मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे उपस्थित होते.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ठाण्यातील वागळे इस्टेटसह संपूर्ण शहरात मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. मुंबईतही सकाळीच चांगला प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. मतदान हा लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा हक्क आहे. आपल्या शहराच्या विकासासाठी, भविष्यातील सोयी-सुविधांसाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना त्यांनी निवडणूक आयोग पारदर्शक आणि काटेकोर पद्धतीने काम करत असल्याचे सांगितले. कुठेही मतदान यंत्रात अडचण आल्यास त्याची तातडीने नोंद घेऊन मतदार वंचित राहू नयेत, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कोणतेही बोगस मतदान होऊ नये, प्रत्येक मतदाराला आपला हक्क बजावता यावा, यासाठी आयोग दक्ष आहे. त्यामुळे सर्वांनी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मोठ्या प्रमाणावर मतदान होईल, असा विश्वास व्यक्त केला.



# दिवा शहरात मतदान उत्साहात तर अनेक केंद्रावंर रांगा



**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा शहरात मतदान उत्साहात पार पडलेले दिसून आले तर अनेक मतदान केंद्रावंर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. दिवा शहरातील सर्व उमेदवारांचे भविष्य मतपेटीत जमा झाले असून आज ठाणे महानगरपालिकेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे. दिवा शहरातून ठाणे महानगर पालिकेत एकूण ११ नगरसेवक जाणार असून रखडलेली निवडणुक आज सेंट मेरी शाळेत ईव्हीएम मशीन ३५ मिनिटे बंद पडल्याची घटना वगळता दिव्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदान शांततेत पार पडले असून भावी नगरसेवकांचे भावितव्य आज स्पष्ट होणार आहे. गुरूवारी सकाळीच मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी रांगा दिसून आल्या तर आपण नगरसेवक व्हायचेच आहे म्हणून गेल्या आठ वर्षापासून लोकांची कामे करणारे उत्साही कार्यकर्ते, माजी नगरसेवक यांनी सकाळपासून आपल्या मतदारांना कार्यकर्ते लावून घराबाहेर काढण्यास सुरूवात केली होती. दिव्यात सततची वाहतुक कोंडी आणि अशा अनेक समस्यांमुळे त्रस्त असलेला कार्पोरेट, मध्यमवर्गिय घरातील मतदार मुठी आवळून मतदानासाठी बाहेर पडला होता. या सगळ्या समस्या सोडविण्याचे मतदान हे एकमेव साधन आपल्या हातात आहे. हाच विचार करून ही मंडळी यावेळी पर्यटनाचा, सुट्टी म्हणून घरात आराम करू असा विचार न करता बाहेर पडली होती. शाळेला सुट्टी असल्याने या मंडळींची शाळकरी मुले मतदान म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी आपल्या आई, वडिलांच्या सोबत आली होती. दिव्यांग व्यक्ति आपल्या तीन चाकी सायकलवरून मतदान केंद्रावर आल्या होत्या. उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते मतदारांना मतदान केंद्रांप्रमाणे मतचिठ्ठया देण्यासाठी, मतदान केंद्रापर्यंत सोडण्यासाठी सहकार्य करत होते. अनेक उमेदवारांनी आपल्या जनसंपर्क कार्यालयाजवळ १५ ते २० रिक्षा भाड्याने घेऊन ठेवल्या होत्या. दिव्यांग, रुग्ण, वृध्द मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत नेण्यासाठी ही मंडळी रिक्षांचा वापर करत होती.

# करमाळा पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी

## ९.७८ लाखांची सोन्याची पाटली चोरी प्रकरणी आरोपी जेरबंद




**करमाळा । प्रतिनिधी**

करमाळा पोलीस ठाण्याने उत्कृष्ट तपास करून तब्बल ९ लाख ७८ हजार ३४५ रुपये किमतीची १४.७४० ग्रॅम वजनाची सोन्याची पाटली जप्त करत चोरी प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी राहुल दिलीप गायकवाड (वय ३०, रा. दावडी, ता. करमाळा) यास अटक करण्यात आली आहे. दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी करमाळा बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने लता रामदास बागल (रा. मांगी ता. करमाळा) यांच्या हातातील पिशवीतून सोन्याची पाटली लबाडीने चोरून नेली होती. याबाबत करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ४५९ २०२६ भा.दं.वि. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील आरोपी दीर्घकाळ फरार असल्याने पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री रणजित माने यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस हवालदार सुशीलकुमार पवार यांनी गोपनीय बातमीदार, सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करून आरोपीची ओळख पटवली. मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार परिसरात सापळा रचून आरोपी राहुल गायकवाड यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीस गेलेली सोन्याची पाटली जप्त करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये १४.७४० ग्रॅम वजनाची व १.७८ लाख रुपये किमतीची सोन्याची पाटली समाविष्ट आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुशीलकुमार पवार करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक श्री रणजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे. सुशीलकुमार पवार, पोहे. बापूसाहेब कोकाटे, पोहे. अजित उबाळे, पोहे. प्रसाद कोटे व पोहे. व्यंकटेश मोरे यांच्या पथकाने केली. करमाळा पोलिसांच्या या यशस्वी कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसल्याने पिकांची नासाडी

**पाथर्डी । प्रतिनिधी**

राहुरी येथील मुळा पाटबंधारे प्रकल्पाच्या शाखा कालव्याला दिनांक ५ जानेवारीपासून आवर्तन सोडण्यात आले होते. या आवर्तनाचा फायदा नेवासा, शेवगाव, पाथर्डी आणि राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार होता. मात्र, पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा गावाजवळ पाटावरील नाल्याचे दोन दिवसांपूर्वीच सिमेंट कॉंक्रीटने पुनर्बांधणी करण्यात आलेले बांधकाम ताजे असल्यामुळे पाण्याच्या दाबाने तेथे सिमेंटच्या प्लेटा तुटल्या आणि पाटचारीला धळ पडली. परिणामी काही क्षणांतच पाटातील पाणी ओढ्याकडे वाहू लागले.

या पाण्याचा प्रवाह जवखेडे शिवारातील मतकर पट्टी, वाघोली शिवारातील दातीर पट्टी, कोपरे शिवारातील गोगड पट्टी तसेच आव्हाड कुटुंबाच्या शेतातून होत आल्हाट वस्तीतून वडुले-वाघोली नदीकडे मिळाला. त्यामुळे जवखेडे, कोपरे, वडुले आणि वाघोली शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसून कांदा, मका, घास, गहू आणि हरभरा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.पावसामुळे आधीच फटका बसलेल्या शेतकऱ्यांना या दुर्घटनेने आणखी एक मोठा धक्का बसला आहे. पाटाचे पाणी शेतात घुसल्याने शेतकरी हवालदिल झाले असून, तात्काळ नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.मात्र महसूल आणि पाटबंधारे विभागाचे अधिकारी जबाबदारी टाळत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पाटावरील नाल्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून नेवासा तालुक्यातील ठेकेदारांना हे काम देण्यात आले होते. पाटाला पाच तारखेला पाणी सोडले जाणार असल्याने घाईघाईत हे काम पूर्ण केल्यामुळे गुणवत्तेचा दर्जा घसरला आणि परिणामी दोन दिवसांतच पाट फुटला.या घटनेमुळे हजारो क्युसेस पाणी वाया गेले असून पाटबंधारे विभागाच्या निष्काळजीपणावर शेतकऱ्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी ठेकेदारांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.पूर्ण कामाची पुन्हा नव्याने दुरुस्ती न झाल्याशिवाय ठेकेदाराचे बिल अदा करू नये, अशी मागणीही शेतकरी वर्गातून करण्यात आली आहे.

# वनमंत्री तथा पालकमंत्री गणेश नाईक यांचे व्हाईट हाऊस महाराष्ट्राच्या औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावर!


## शंभर कोटीचा घोटाळा झाला असल्याचा बाळासाहेब मिरजे यांचा आरोप; गणेश नाईक यांनी राजीनामा द्यावा पत्रकार परिषदेमध्ये बाळासाहेब मिरजे यांची मागणी!

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांचे नवी मुंबई येथील कार्यालय चक्क महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र शासन अंगिकृत यांच्या जागेवर बांधण्यात आले असल्याची खळबळ जनक माहिती पत्रकार परिषद दरम्यान समोर आलेली आहे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या कार्यालयाकडून एकूण शंभर कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मिरजे यांनी पत्रकार परिषदेत केलेला आहे या घोटाळ्याची निपक्षपातीपणे चौकशी करायची असल्यास प्रथम पालघरचे पालकमंत्री तथा राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी राजीनामा द्यावा अशा प्रकारची खळबळ जनक मागणी बाळासाहेब मिरजे यांनी वाशी तुंग हॉटेल येथे घेतलेल्या पत्रकार परिषदे दरम्यान पत्रकारांशी बोलताना केलेली आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे महापे येथे असलेल्या कार्यालयातून भूखंड ए- १४ ए- १५ ए -१६ या भूखंडावरील झालेल्या भ्रष्टाचाराबाबत त्यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते त्याबाबत ए -१४ ग्रीनस्कपे डेव्हलपर्स प्राइवेट लिमिटेड भुखंड क्षेत्र २३९० चौ.मी भूखंडावरील वापर इंजिनिअरिंग आणि वाटपाचा दर १३५ चौरस मीटर याप्रमाणे दिला गेला असून ए -१५ कंपनी व भूखंड धारकाचे नाव श्री संदीप गणेश नाईक, सार्थ इन्फोटेकचे प्रोप्रायटर (मालक) भूखंडाचे क्षेत्र ३७४४ चौ. मी. असे आहे व भूखंड वरील वापर आयटी/ आयटीइएस वाटपाचा दर ३००/ प्रति चौ. मी. याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आकारलेला आहे तर ए -१६ कंपनी व भूखंडधारकाचे नाव निशांत फूड्स प्राइवेट लिमिटेड भूखंडाचे क्षेत्र ५००६ चौरस मीटर व त्या भूखंडावरील वापर ब्रेड बिस्कीट तयार करणे वाटपाचा दर २०० प्रति चौरस मीटर याप्रमाणे आहे सदरचे भूखंड गणेश नाईक आणि त्यांचे सुपुत्र संदीप नाईक यांच्या ताब्यात असून त्या भूखंडावरती अशा कोणत्याच प्रकारचे उत्पादक निर्मिती होत नसून त्या जागेवरती गणेश नाईक यांनी त्यांचे स्वतःचे कार्यालय म्हणजेच नवी मुंबईतील व्हाईट हाऊस या नावाने ओळखले जाणारे कार्यालय थाटलेले आहे आहे व बाकी भूखंडावरती देखील त्यांचाच ताबा आहे

अनेक वर्षापासून हे भूखंड यांच्या ताब्यात असून या भूखंडावर तब्बल १०० कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप बाळासाहेब मिरजे यांनी केलेला आहे. महाराष्ट्र सरकारने याबाबतची गंभीर दखल घेत चौकशी करावी अशी मागणी देखील बाळासाहेब मिरजे यांनी केलेली आहे.

दरम्यान: त्यांनी याबाबत नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना निवेदन देऊन भूखंड १४ १५ १६ याबाबत कशा प्रकारचे गैर वर्तन झालेले आहे याबाबत चौकशी करावी व त्यात सत्यता आढळल्यास गणेश नाईक व संदीप नाईक यांच्यावरती कायदेशीर कारवाई करावी अशा प्रकारची मागणी निवेदनाद्वारे मिरजे यांनी केलेली आहे.



**मी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व उद्योग मंत्री यांची भेट घेऊन याबाबतची सत्यता मांडणार आहे जर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी व उद्योग मंत्र्यांनी यावर कारवाई नाही केल्यास मी न्यायालयाचा दरवाजा ठोठवल्या शिवाय राहणार नाही. १०० कोटी पेक्षा जास्त भष्टाचार होऊन सुद्धा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी गप्प का आहेत त्यांना देखील न्यायालयात खेचल्याशिवाय राहणार नाही**

**–बाळासाहेब मिरजे , सामाजिक कार्यकर्ते**

**महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ या मंडळाचा मुख्य उद्देश म्हणजे उद्योजकांना जागा मिळवून देणे त्यातून रोजगाराची निर्मिती होत असते असे भूखंड राजकीय पक्षाच्या नेत्यांना देऊन त्यांनी जर त्यांच्या स्वतःचे कार्यालय दिमाखात थाटले असतील तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी झोपा काढत आहेत का? असा देखील सवाल उपस्थित होतो अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची देखील चौकशी होऊन त्यांना निलंबित केले पाहिजे. व त्यांच्यावरती देखील फौजदारी गुन्हे दाखल झाले पाहिजेत**

# संपादकीय

## कुंकवाचं लेणं



लग्नसराईत नटण्याची हळदीला कोण घाई कुंकुमतिलकाने सौभाग्य वाणाची लयलूट होई. कुमारिका, सौभाग्यवती यांना देण्यात येणारं वाण संस्कृतीचा भाग झालं. पुढे जाऊन या वाण प्रथेने साहित्य आणि संस्कृतीवर आपली मोहोर उठवली. एका वाक्यात सांगायचं झालं तर, सवाष्ण वाणं म्हणजे सहज प्राप्त होणाऱ्या उपयुक्त गोष्टींचा साधक विचार. प्रापंचिक जीवनात वापरात येणाऱ्या तसचं गृहिणींना आनंद देणाऱ्या गृहोपयोगी वस्तू वा जिन्नस यांची लयलूट जी काळ्या-पांढऱ्या तिळावर गुळरूपाचा संस्कार करते. हवेत पडलेल्या गारव्याला थोडीशी ऊब मिळावी या हेतूने संस्कारित सण साजरा करताना हळदी-कुंकवाचं महत्त्व वाढतं. वर्षभराने येत असलेल्या सणाची पाळंमुळं जनमानसात मुरलेली असल्याने उसनं वाणं देण्या-घेण्याच्या प्रथा संस्कृतीला जिवंत ठेवतात. घरोघरच्या हळदी-कुंक घाटातला पहिला सौभाग्याचा मान सुवासिनींचा. विसरता न येण्यासारखा कुंकवाचा विषय महिलांसाठी हळव्या कोपऱ्यासारखा असतो. माथ्यावरचं भलंमोठं कुंकू धन्याची साक्ष देतं, त्याच्यावरचं प्रेम व्यक्त करतं. आपल्या धर्मात लहानपणापासून भाळी गंध लावली जात असल्याने मुलगा वा मुलगी गंध, नाम, बुक्का, कुंकू, चिरी, टिकल्या कपाळाची शोभा वाढवताना दिसतात. बाल्यावस्थेत काजळ, पावडर टिका, चंदन टिळा लावून सजवलं जातं. कुमारिका पूजल्या जातात. त्यांच्यावर संस्कार होतात. हळदी-कुंकवाची व्याख्या पसरते. मुली संस्कार विसरत नाहीत, नव्याने शिकत जातात. संस्कृतीतील महत्त्वाचा विधी आणि सामाजिक सोहळा असलेलं हळदी-कुंकू सौभाग्य-आरोग्य- समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानलं जातं. सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमातही कुंकू वापरलं जातं. त्याला सौभाग्याचं प्रतीक मानलं जातं ज्याने नकारात्मक ऊर्जा दूर सारली जाते. स्त्रियांच्या सौभाग्याचे रक्षण करता पतीच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना केली जाते. दुर्गादेवी आणि लक्ष्मीमातेची कृपा प्राप्त होण्यासाठी कुंकुमतिलकाने पूजा आराधना केली जाते. कुंकवाला पिंजर असंही संबोधलं जातं. धार्मिक बाबतीत, मंगल कार्यात कुंकवाचा वापर केला जातो. बालपणीच संस्कृतीचा ठेवा घेऊन आलेलं कुंकू म्हणजे कैक अनुभवाची पुंजी असते जी सासर माहेराला जोडणारा दुवा असते. आनंदाची आनंदाला भेट घडवण्यासाठी हळदी-कुंकवाचं प्रयोजन केलं जातं. देवतांना कुंकूमार्जन प्रिय असल्याने त्यांचा आशिष पाठीशी राहतो. असे मानले जाते की, ब्रह्मांडातील सुप्तशक्त जागी होऊन स्त्रियांच्या ठिकाणी लक्ष्मीतत्त्व जागृत होतात. कुंकवाची बोट मस्तकी लागताचं शक्ती संचारते. नकारात्मक ऊर्जा शोषली जाते. एकाग्रता वाढते, ज्यामुळे घर आणि कुटुंबाचं रक्षण होतं. बाईला बाईपण येतं. संस्कार संस्कृतीच्या छायेत पिढ्या शिकून मोठ्या होतात. आनंदाला पारावार उरत नाही. पदरात पडलेलं सौभाग्याचं दान शाश्वत लेणं होऊन सुखावतं.


कुंकवाचं स्थान अधोरेखित करताना बहिणाबाई म्हणतात...

लपे करमाची रेखा, माझ्या कुंकवाच्या खाली... पुशीसनी गेलं कुकू, रेखा उघडी पडली...

कपाल रेखा उघडी पडण्याचं दुर्भाग्य कुणालाही नको असतं. पण सत्याशी पाठ दाखवता येत नाही हेचं खरं. कुंकवाचं लेण म्हणजे सौभाग्याचं लेणं. ज्यात स्त्रीच्या सौभाग्याचे प्रतीक मानले जाणारे दागिने, मंगळसूत्र, बांगड्या, कुंकू, जोडवी पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि कुटुंबाच्या समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण मानले जातात. यात मंगळसूत्र सर्वात श्रेष्ठ मानले जाते.

याच दिवशी संस्कृती, परंपरा जोपासणारे सण चैतन्य घेऊन येतात. चैतन्याची ज्योत कायम तेवत ठेवण्याच्या वचनात इतरांना सणाचा आनंद देतो. तिळाचा गोडवा कायम राखणारे आशेचे पतंग भरारी घेण्याची स्वप्न पाहतात. मनात वृद्धिंगत होणारा दीपोत्सव कायम उजळत राहावा या हेतूने नववर्षाच्या प्रारंभी आलेला सण घरादारावरची जळमटं दूर सारतो. सूर्याचा मकर राशीतला प्रवेश म्हणजे सण दाराशी आल्याचा सांगावा. हिवाळ्यातल्या गुलाबी दिवसाची ऊबदार रजईतली झोप अनिवार होते. पित-केशरी तांबड फुटण्यापूर्वी, कोंबड्याने बांग देण्याआधी आसमंत दवात नाहतो. शीत वारे दारखिडक्यांच्या फटीतून डोकावतात. पक्षी किलबिलाटाने सभोवती निसर्गमय शाळा सुरू होते. सौर कालगणनेशी संबंधित संक्रांतीपासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. पौष महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. दिवस मोठा रात्र लहान होत जाते. हंगामात उष्णता वर्धक हरभरे, गहू लोंबे, ऊस, तीळ, मटार, बोरं धान्याची शेती झाल्याने गरजेनुसार आदान-प्रदान होते. माती तत्त्वाने भरलेल्या सुगडाची हरभरा, तीळगूळ, ऊस, बोराने पूजा बांधली जाते. मानाची, पानाची, दानाची परंपरा जोपासताना काळ्या रंगाचे महत्त्व अबाधित असल्याने तीळगूळ घ्या, गोड गोड बोला, आमचा तीळ सांडू नका आमच्याशी भांडू नका अशा संदेशाचा, सामाजिक सद्भावना वाढवणारा आणि सद्विचारांचे आदान प्रदान करणारा सण भारतीय परंपरेचा आरसा दाखवतो. आजचा दिवस उत्साहाने साजरा करायचा. वायुवेगे वाहणाऱ्या वाऱ्याला पतंगाच्या साथीने उडवण्याचा, विविधांगी रंग जनमानसात पसरविण्याचा. मनरूपी पतंग आकाशात भिरभिरवण्याचा.खेळाशी मेळ साधत आलेला दिवस चांगुलपणाने जपण्याचा. शेक्सपियरच्या मते माणसाच्या हृदयात उगम पावलेला चांगुलपणा त्याच्यानंतर मागे उरतो. दिव्याचा प्रकाश लांबवर पसरतो तसे चांगुलपणाची किर्ती दूरवर पसरते. कारण तेव्हा तुम्ही इतरांशी आणि स्वत:शी उत्तम वागलेले असता. आनंदाचं दुसरं नाव उत्तम वागणं आहे, जेणेकरून जेवढं मन उत्साही आणि आनंदी तेवढा तुमचा पतंग आकाशाला गवसणी घालण्याचा संकल्प बांधणारा ठरेल. शरीराला जशी आरामाची गरज असते तशीचं मनाला चैतन्याची गरज असते. हळदी-कुंकवाच्या निमित्ताने एकत्र येऊन नाती वृद्धिंगत करता येतात. सद्भावना वाढवता येते. मैत्रैय कायम राखता येते. तीळगुळाची गोडी आधी मनात मग नात्यात पेरता आली की मन पाखरांचे थवे बनून स्वैर मोकळ्या आकाशात स्वच्छंदी विहारायला मुक्त होतं, हीच या सणांची जादू आहे.

# मोबाईल फोन आणि लॅपटॉपमुळे होतोय परिणाम? या ३ सवयी लगेच दूर करा



मोबाईल फोन आणि लॅपटॉप आज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. काम, अभ्यास, मनोरंजन आणि सोशल मीडियापासून ते सर्व गोष्टींसाठी स्क्रीनचा वापर वाढला आहे. मोबाईल फोनकडे जास्त वेळ पाहिल्याने किंवा लॅपटॉपवर जास्त वेळ काम केल्याने मानेवर आणि डोळ्यांवर सतत ताण येतो. यामुळे मान कडक होणे, वेदना होणे आणि डोळ्यांमध्ये जळजळ किंवा जडपणा येऊ शकतो. सुरुवातीला बरेच लोक ही एक किरकोळ समस्या म्हणून दुर्लक्ष करतात, परंतु कालांतराने ही समस्या आणखी वाढू शकते. म्हणून काही सवयी सुधारणे महत्वाचे आहे.सतत स्क्रीनकडे पाहत राहिल्याने झोपेवरही परिणाम होतो आणि डोकेदुखी होऊ शकते. जर हे दुखणे वेळेवर कमी झाले नाही तर हे दुखणे दैनंदिन जीवनावर परिणाम करू शकते. हे टाळण्यासाठी कोणत्या सवयी सुधारल्या पाहिजेत ते पाहूया.मान आणि डोळे दुखणे टाळण्यासाठी कोणत्या सवयी बदलल्या पाहिजेत?: लेडी हार्डिंग हॉस्पिटलचे डॉ. एल.एच. घोटकर स्पष्ट करतात की, मान आणि डोळे दुखणे टाळण्यासाठी, प्रथम तुमच्या स्क्रीन पाहण्याच्या सवयी बदलणे आवश्यक आहे. मोबाईल फोन किंवा लॅपटॉप वापरताना योग्य पोश्चर ठेवा आणि जास्त वाकणे टाळा. तासन्तास स्क्रीनकडे पाहणे टाळा; वारंवार ब्रेक घ्या. तुमच्या डोळ्यांना थोडा आराम देण्यासाठी स्क्रीनची चमक संतुलित करा.

फोन डोळ्यांजवळ खूप ठेवण्याची सवय हानिकारक ठरू शकते. शिवाय, काम करताना खुर्ची आणि टेबलाची उंची योग्य असली पाहिजे. वाईट सवयी दीर्घकाळात वेदना वाढवू शकतात. म्हणून, त्या त्वरित दुरुस्त करणे महत्वाचे आहे. दुर्लक्ष केल्यास कोणते आजार होण्याचा धोका असतो?: जर मान आणि डोळ्यांच्या दुखण्याकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केले तर त्यामुळे गंभीर समस्या उद्भवू शकतात. गर्भाशयाच्या मुखात वेदना, स्नायूंमध्ये उबळ आणि पाठीच्या कण्याच्या समस्या वाढू शकतात. दृष्टीदोष, कोरड्या डोळ्यांचा सिंड्रोम आणि सतत डोकेदुखी देखील होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, झोपेचा अभाव आणि वाढता ताण मानसिक आरोग्यावर देखील परिणाम करू शकतो.या सवयी देखील अंगीकारा: दर २० मिनिटांनी डोळ्यांना विश्रांती द्या. मोबाईल फोन वापरताना सुरक्षित अंतर ठेवा. मानेचे आणि डोळ्यांचे हलके व्यायाम करा. स्क्रीन टाइम मर्यादित करा. झोपण्यापूर्वी मोबाईल फोनचा वापर कमीत कमी करा.

# श्री गुरु तेग बहादुर- 'हिंद दी चादर'

श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ - नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.एप्रिल १६२१ मध्ये अमृतसरमध्ये श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरू हरगोबिंद आणि माता गुजरी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना तेग बहादूर म्हणजेच तलवारीसारखा धैर्यवान हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत




असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले.

मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरूतेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती.त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

'जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै,
सुख सनेहु अरू भय नहीं जा कै, कांचन माटी मानै,
लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै
जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै'

म्हणजेच जो मनुष्य दु:खात असला तरी दु:खी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत.त्यांच्या शहीद समागमास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अल्पसंख्यांक विभाग आणि श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.नुकत्याच या कार्यक्रमांच्या आयोजनानिमित्त कार्यशाळा घेण्यात आली होती. यावेळी 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेनिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले होते आणि हा कार्यक्रम जनमानसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करीत आहे. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

# Amazon ग्रेट रिपब्लिक डे सेल २०२६ सेल दरम्यान या टॅब्लेटवर मोठी सूट

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

अमेझॉन ग्रेट रिपब्लिक डे सेल २०२६ च्या तारखांची घोषणा झाल्यानंतर आता वस्तूंवरील डीलबद्दल सांगितले जात आहे. अमेझॉनने हळूहळू डील उघड करण्यास सुरुवात केली आहे. जर तुम्ही नवीन टॅबलेट खरेदी करण्याचा विचार करत असाल तर सेल दरम्यान तुम्ही नवीन टॅबलेटवर हजारो रूपयांची बचत करू शकता. सेल दरम्यान इलेक्ट्रॉनिक्स आणि ॲक्सेसरीजवर ७५ टक्क्यांपर्यंत सूटवर उपलब्ध असणार आहे. सेलच्या मायक्रोसाइटवरून असे दिसून येते की Xiaomi आणि OnePlus ब्रँडचे टॅब्लेट धमाकेदार सुट देऊन विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.




**XI-OMI Pad ७ ची भारतातील किंमत**

नॅनो-टेक्श्चर डिस्प्ले असलेला हा शाओमी टॅबलेट सध्या विक्री सुरू होण्यापूर्वी Amazon वर ३१ हजार ९९९ रूपयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध केला जात होता, परंतु विक्री दरम्यान यावर बंपर सुट देण्यात आली आहे त्यामुळे हा टॅबलेट २५ हजार ९९९ रूपयांमध्ये तुम्हाला खरेदी करता येणार आहे. याचा अर्थ असा की या टॅबलेटवर ६००० रूपयांची सुट देण्यात येत आहे.

वनप्लस पॅड गो २ ची भारतातील किंमत

२.८ के रिझोल्यूशन आणि १२.१-इंच डिस्प्ले असलेला हा टॅबलेट सध्या सेलपूर्वी ३१ हजार ९९९ रूपयांमध्ये विकला जात आहे. या किमतीत तुम्हाला ८ जीबी रॅम आणि २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंट मिळेल. १००५० एमएएच बॅटरीसह पॅक केलेला हा टॅबलेट सेल दरम्यान २९ हजार ९९९ रूपयांमध्ये विकला जाईल. याचा अर्थ असा की तुम्ही सेल दरम्यान हा टॅबलेट २००० कमी किमतीत खरेदी करू शकाल.

अतिरिक्त बचत कशी करावी

वर नमूद केलेल्या टॅब्लेटवरील उत्पादन सवलतींव्यतिरिक्त तुम्ही बँक कार्डसह अतिरिक्त बचतीचा आनंद घेऊ शकता. जर तुम्ही तुमचा टॅब्लेट खरेदी करताना डइख क्रेडिट कार्डने पैसे दिले तर तुम्हाला १०% त्वरित सवलत देखील मिळेल, ज्यामुळे दुप्पट बचत होईल. तुम्ही या सेल मध्ये एक्सचेंज ऑफरचा देखील लाभ घेऊ शकाल. शिवाय सेल दरम्यान ग्राहकांच्या सोयीसाठी नो-कॉस्ट EMI उपलब्ध असणार आहे. ज्यामुळे तुम्ही आवडत्या वस्तू खरेदी करू शकाल.

# शेलघरचे तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी साजरी

## वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महेंद्रशेठ घरत यांची जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट



**उरण । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते महेंद्रशेठ घरत यांचे वडील दिवंगत तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी बुधवारी साजरी करण्यात आली. तुकाराम नारायण घरत यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांना तुरुंगातही जावे लागले, परंतु ते मागे हटले नाहीत. त्यांनी त्याकाळी शैक्षणिक, सामाजिक चळवळ राबवली. तोच वसा आज महेंद्रशेठ घरत यांनी घेतला असून सामाजिक कार्यात त्यांनी सर्वसामान्यांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त महेंद्रशेठ घरत यांनी जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट देऊन आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. हा कार्यक्रम उलवे नोड मधील 'भूमिपुत्र भवन'मध्ये झाला.

यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, महेंद्रशेठ यांनी आपल्या वडिलांचा वारसा उत्तमरित्या चालविला आहे. दिवंगत ज. आ. भगत यांची प्रेरणा घेऊन तो सर्वच क्षेत्रांत धडाडीने काम करतोय. वडिलांच्या नावे ज्युनियर महाविद्यालय, तर आईच्या नावाने यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था सुरू करून गोरगरिबांसाठी शैक्षणिक कार्य त्याने जोमाने सुरू ठेवले आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्ही निवडणुकीपुरते राजकारण करतो, बाकी आमच्या मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी आम्ही घेतो. यावेळी 'पैशाने तुटली नाती' हे नाटक सादर करण्यात आले. आगरी बोली भाषेतील हे नाटक रसिकांनी डोक्यावर घेतले. खचाखच भरलेल्या 'भूमिपुत्र भवन'मध्ये रसिकांच्या टाळ्यांनी कलाकारांची मने जिंकली. भूमिपुत्र भवनमध्ये 'पैशाने तुटली नाती' हे पहिल्यांदाच नाटक सादर करण्यात आले. त्यामुळे कलाकार, रसिक यांच्या प्रेमाला भरते आले होते.दिवंगत तुकाराम नारायण घरत यांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर, उरण नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिबांचे पुत्र अतुल पाटील, महेंद्रशेठ यांचे सासरेबुवा रामशेठ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, साई मंदिरचे अध्यक्ष रविशेठ पाटील आदी शेकडो मान्यवर उपस्थित होते.दरम्यान, यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या गव्हाण येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि खारकोपर येथील दिवंगत तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजमध्येही पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



**ठाणे : दिव्यातील प्रभाग क्र २७ मधील शिवसनेचे चारही उमेदवार शैलेश मनोहर पाटील, स्नेहा अमर पाटील, दीपाली उमेश भगत व अँड. आदेश कमलाकर भगत यांनी दिवा पश्चिम येथील ठाणे महानगरपालिकेच्या शाळेत आपला मतदानाचा हक्क बजावला. ( फोटो – संतोष पडवळ )**

## उरण महाविद्यालयात भूगोल दिन साजरा

**उरण । प्रतिनिधी**

कोंकण ज्ञानपीठ,उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात भूगोल विभागाच्या भूगोल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. गर्जे उपस्थित होते.आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भूगोल विषयाचे महत्त्व विशद करताना, बदलत्या जागतिक परिस्थितीत भूगोलशास्त्राचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. पर्यावरण, हवामान बदल, शहरीकरण व नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन यामध्ये भूगोलाची भूमिका अधोरेखित केली.प्रमुख वक्त्या प्राध्यापिका डॉ. अनुपमा कांबळे यांनी विद्यार्थ्यांना भूगोल विषयातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी जीआयएस , रिमोट सेन्सिंग, पर्यावरणीय अभ्यास, आपत्ती व्यवस्थापन अशा आधुनिक शाखांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले. भूगोल विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनी प्रास्ताविकातून भूगोल दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना, विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक जाणीव आणि पर्यावरणाबद्दलची जबाबदारी निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख ध्येय असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ प्राध्यापक आर. टी. ठवरे आय क्यू.ए सी. समन्वयक डॉ. ए.आर. चव्हाण ,इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे, डॉ. डी पी हिंगमिरे आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.आभार प्रदर्शन डॉ. अनुपमा कांबळे यांनी केले.

## उरण महाविद्यालयात क्रीडा सप्ताह संपन्न



**उरण । प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण - रायगड येथे क्रिडा सप्ताह मोठया उत्साहात संपन्न झाले.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर व्ही. व्ही. गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०८/०१/ २०२६ ते १३/१/ २०२६ या कालावधीत कोटगाव ग्राम सुधारणा खेळाचे मैदान या ठिकाणी क्रीडा सप्ताह संपन्न झाला. क्रीडा सप्ताहासाठी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा.इंदुलकर व प्रा.आर. टी. ठवरे हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून कोटगाव ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष जयेश भोईर हे उपस्थित होते. सदर क्रीडा सप्ताह मध्ये क्रिकेट, खो-खो, कबड्डी, फुटबॉल या सांघिक खेळासह धावणे, उंच उडी ,लांब उडी ,थाळीफेक, भालाफेक, गोळा फेक, चेस, कॅरम बॅडमिंटन इत्यादी वैयक्तिक स्पर्धाही घेण्यात आल्या. विजेत्या खेळाडूंना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सदर क्रीडा सप्ताहात बहुसंख्येने सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचारी वृंद उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनी केले व पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय डॉ. ए. आर. चव्हाण यांनी केले व आभार प्रदर्शन प्राध्यापिका विनिता तांडेल यांनी केले आणि सूत्रसंचालन डॉ. एमजी लोणे यांनी केले.

### स्वीप समितीच्या वतीने 'मनपा ऑन एअर' उपक्रम

## विविध रेडिओ वाहिन्यांवरून प्रेरक मुलाखती व संदेश प्रसारित

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदारांमध्ये जनजागृती व्हावी आणि मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने अहिल्यानगर मनपा स्वीप समितीच्या वतीने 'मनपा ऑन एअर' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत योगदान देणारे विविध अधिकारी, मान्यवर व्यक्ती आणि संस्थांच्या प्रतिनिधींच्या प्रेरक मुलाखती व शुभेच्छा संदेश विविध रेडिओ वाहिन्यांवरून प्रसारित केले जात आहेत. रेडिओच्या माध्यमातून घराघरांत सकारात्मक संदेश पोहोचत असल्याने मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत आहे. अहिल्यानगर आकाशवाणी, रेडिओ नगर, रेडिओ आशा, रेडिओ सिटी, बिग एफएम, रेडिओ ऑरेंज तसेच विविध कम्युनिटी रेडिओ सेंटर्सवरून हे प्रसारण सुरू आहे. यात निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे, प्रक्रियेतील विविध अधिकारी, जिल्हा मतदारदूत डॉ. अमोल बागुल, तसेच उपक्रमात सहभागी सिनेअभिनेते, कलाकार, मतदार समन्वयक, स्वयंसेवक आणि स्वीप धुरंधर यांच्या निवडणूक प्रक्रियेविषयीच्या मुलाखती, शुभेच्छा संदेश आणि जिंगल्स प्रसारित करण्यात येत आहेत.या उपक्रमासाठी आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख सुदाम बटुळे, रेडिओ नगरचे संचालक भूषण देशमुख, तसेच आरजे प्रसन्न, धनेश खत्ती, सचिन जगताप, तन्मय जयस्वाल, राधिका कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

# साकळाई पाणी योजनेच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील गावे दुष्काळमुक्त करणार-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

## सारोळा कासार येथे सुमारे ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

साकळाई पाणी योजनेच्या कामाची सुरुवात येत्या पंधरा दिवसात करण्यात येईल. या पाणी योजनेच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील गावांना दुष्काळमुक्त करण्यात येईल, अशी ग्वाही जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.अहिल्यानगर तालुक्यातील सारोळा कासार येथे सुमारे ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास दिलीप भालसिंग, उद्योजक दिलीप दाते, सरपंच सौ. आरती कडूस, रविंद्र कडूस, सौ. योगिता निंभोरे, किरण साळवे, संतोष खोबरे, दादाभाऊ चितळकर, रंगनाथ निमसे आदी उपस्थित होते.पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, या भागातील लोकांना अनेक वर्षे पाण्याची प्रतीक्षा करावी लागली. साकळाईच्या सर्व कामांना शासनाने मंजुरी दिली असून, पुढील पंधरा दिवसांत कामाला सुरुवात करण्याच्या सूचना विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. साकळाईच्या कामामुळे सारोळा कासार येथील २९५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन १३ बंधाऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.केंद्र सरकारने नव्याने आणलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक गावाला निधी उपलब्ध होत असून, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या विकासाचे नियोजन करताना रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ विविध समाजघटकांना मिळत आहे. सुरू केलेली एकही योजना बंद नाही. कोविडनंतर सुरू झालेल्या मोफत धान्य योजनेची मुदत वाढविण्यात आली असून, 'लाडकी बहीण' योजनाही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले, कुकडी कालव्याच्या कामांना ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून, कालव्याची कामे मार्गी लागल्यानंतर आवर्तनाचा चाळीस दिवसांचा कालावधी कमी होईल. शेवटच्या गावाला पाणी मिळावे म्हणून पाईपलाईनद्वारे पाणी देण्याचा विचार जलसंपदा विभाग करीत आहे. जिल्ह्यात रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली येत असलेल्या गुंतवणुकीचा फायदा जिल्ह्याला कसा होईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संरक्षण उत्पादनाचे केंद्र म्हणून आपला जिल्हा नावारूपाला येईल. दळणवळणाची साधने उपलब्ध होत आहेत. छत्रपती संभाजीनगर – पुणे ग्रीन फिल्ड मार्ग होत आहे. जिल्हा मोठ्या औद्योगिक नगरांना जोडला जात असल्याने, जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचे काम युवकांच्या भवितव्याच्या दृष्टीने करायचे आहे. असेही त्यांनी सांगितले.घोसपुरी येथे माजी सैनिकांनी उभारलेल्या कमानीचे लोकार्पणही मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सैनिकांच्या त्यागाला समाज विसरून जातो, अशी खंत व्यक्त करून 'राष्ट्र प्रथम' ही भावना असली पाहिजे, असे ते म्हणाले. जिल्ह्यातील सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, अकोला जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या स्मारकाप्रमाणे आपल्या जिल्ह्यातही स्मारक उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.



# कळंबोलीत मतदान शांततेत, प्रभाग क्रमांक ८ मध्ये इव्हीएम मशीन दीड तास बंद,मतदार एक तास ताटकळत उभा, सुरक्षेसाठी दुकाने बंद

**पनवेल । प्रतिनीधी**

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कळंबोलीतील चार प्रभागाचे मतदान गुरुवारी सायंकाळपर्यंत शांततेमध्ये पार पडले एका मतदान केंद्रावर प्रारंभीच मतदान यंत्र बंद पडल्याने तब्बल दीड तास मतदान होऊ शकले नाही किरकोळ बाचाबाची चे प्रसंग वगळले तर कळंबोलीतील मतदान प्रक्रिया पूर्ण शांततेत पार पडली . कळंबोलीतील कारमेल हायस्कूलमध्ये मतदान सखी केंद्र हे सर्वांचेच आकर्षक ठरले. या केंद्रावरील मतदार सेल्फी तर घेतच होते. पण अन्य ठिकाणी मधीलही महिलावर्ग तेथे येऊन सेल्फी घेण्याचा त्यांना मोह आवरला नाही.मुदत संपण्यास आलेल्या मार्कर पेन ची चर्चाही सर्वत्र होत होती.कळंबोली वसाहतीमध्ये पनवेल महापालिकेमधील सात, आठ, नऊ,दहा,असे चार प्रभाग असून यामध्ये १२ नगरसेवक निवडून जाणार आहे. या चारही प्रभागातील मतदारांसाठी सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या जुनी व नवी इमारत, न्यू इंग्लिश स्कूलच्या दोन इमारती,महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची एक इमारत,कारमेल शाळा व सेंट जोसेफ शाळा यामधून मतदान केंद्र निर्माण करण्यात आले होते. प्रभाग क्रमांक सात मध्ये २८ ८५५ प्रभाग आठ मध्ये २०५३१ प्रभाग ९ मध्ये २० ३४३ प्रभाग १० मध्ये २४३८४ असे एकूण ९४०१३ मतदार कळंबोली वसाहती मध्ये आहेत.या ठिकाणी सकाळपासून अत्यंत धीम्या गतीने मतदान काही अंशी सुरू होते.उन्हाचाही कडाका असल्यामुळे मतदार बाहेर पडण्यास उत्सुक नव्हते. मात्र दुपारनंतर मतदानाची टक्केवारी अचानक वाढू लागली. कळंबोली मध्ये दोन दिवसांपूर्वी झालेल्या मारामारीच्या घटनेनंतर पोलीस प्रशासनही क्शन मोडवर आले होते. त्यामुळे जादा पोलिसांची कुमक ही कळंबोलीतील सर्व मतदान केंद्राच्या बाहेर तैनात करण्यात आली होती. कळंबोलीतील प्रभाग सात हा जरा हाय व्होल्टेज ड्रामा घडणारा असाच ठरलेला होता. त्यामुळे या परिसरामध्ये जास्तच पोलिसांच्या बंदोबस्त तैनात केला होता. ज्या ठिकाणी मतदान केंद्र आहेत त्या ठिकाणच्या दोन्ही बाजूचा परिसर हा सुरक्षेच्या उपायोजनासाठी बॅरेकेट लावून बंद केल्यामुळे वाहन



चालकांना आपले वाहन लांब लावून तेथून चालतच मतदान केंद्रापर्यंत यावे लागले. त्यातच मतदान केंद्राच्या आजूबाजूकडील सर्व दुकाने बंद केल्याने व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला.तसेच या परिसरातील हाउसिंग सोसायटी मधील राहणाऱ्या नागरिकांना ही विविध समस्यांना सामोरे जावे लागले. या मतदान केंद्राच्या बाहेर किंवा जवळच मतदारांना मतदानाविषयी माहिती मिळावी यासाठी शासनाकडून बसवण्यात आलेल्या बीएलो ना विविध समस्यांना सामोरे जावे लागले. काहींना तर उन्हामध्येच काम करावे लागले. त्यांच्याकडे कोणीच लक्ष न दिल्याने नाष्टा चहापाणी व अन्नाशिवायही त्यांना राहावे लागले.तर काहींना स्वतःची व्यवस्था स्वतःच करावी लागली. मतदान कळंबोलीतील कारमेल हायस्कूलमध्ये निर्माण करण्यात आलेल्या मतदान केंद्रा जवळील मतदान सखी केंद्र हे कळंबोलीतील सर्वांचेच एक आकर्षण बनून राहिले.या ठिकाणी सेल्फी काढण्याचा मोह प्रत्येक येणाऱ्या मतदाराला आवरता आला नाही.या केंद्रावर येणाऱ्यांनी तर आपल्या सेल्फी किंवा फोटो तर काढून घेतलेच पण ज्या पद्धतीत त्याची वाहवा व माहिती अन्य आजूबाजूच्या महिलांना समजल्यानंतर अन्य मतदारही तेथे येऊन फोटो काढून जाऊ लागले. त्यामुळे कारमेल हायस्कूल मधील मतदान सखी केंद्र हे सर्वांचेच आकर्षक केंद्रबिंदू बनल्याचे दिसून आले. एकंदरीत पाहता कळंबोलीतील मतदान हे शांततेतच पार पडल्या सारखे दिसून आले. मतदान करण्यापूर्वी हातावर लावण्यात येणाऱ्या मार्कर पेन हे गतवर्षीच्या १० नोव्हेंबर २०२५ मधील उत्पादित केलेले होते.तर त्यांची मुदत ही ८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतच आहे. त्यामुळेच निकृष्ट दर्जाचे व मुदत संपत आलेल्या मार्कर पेनची व्यवस्था निवडणूक अधिकाऱ्यांनी केल्याने मार्कर पेनने लावण्यात आलेली शाही त्वरित पुसली जात होती. याबाबत अनेकांनी फोटो सोशल मीडियावर शेअर केले. याबाबतची सत्यता पडताळण्यासाठी पाहिले असता त्यावरील असणारी तारीख सर्व काही सांगून गेले. कळंबोलीत झालेल्या एकूण मतदानाची आकडेवारी ही महापालिकेकडून अचूक रित्या सायंकाळपर्यंत समजू शकली नाही.

# गरजूच्या चेहऱ्यावर हास्य;अमर परदेशी,यांचा स्तुत्य उपक्रम

**दौंड । प्रतिनिधी**

वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे किंवा औपचारिक समारंभ नव्हे, तर समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याची संधी असते, हे अमरभैय्या परदेशी यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त खडकी गावातील अपंग नागरिक वाल्मिक जगताप यांना आवश्यक असलेली व्हीलचेअर (अपंग खुर्ची) भेट देण्यात आली.

अपंगत्वामुळे हालचालींवर मर्यादा आलेल्या वाल्मिक जगताप यांच्यासाठी ही व्हीलचेअर नव्या आशेचा किरण ठरली आहे. यावेळी बोलताना अमरभैय्या परदेशी म्हणाले,

गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान हेच माझ्या वाढदिवसाचे खरे गिफ्ट आहे.



या सामाजिक उपक्रमाला ग्रामस्थ, महिला भगिनी तसेच युवक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी कार्य केल्यामुळे अमरभैय्या परदेशी यांनी तरुण पिढीसमोर आदर्श निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. दिखाव्यापेक्षा माणुसकीला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमामुळे खडकी परिसरात अमरभैय्या परदेशी यांच्या सामाजिक कार्याची पुन्हा एकदा सकारात्मक दखल घेण्यात आली आहे.

# केबीपीमध्ये सायबर गुन्हेगारी विषयावर मार्गदर्शन



**नवी मुंबई । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आर्थिक गुप्तवार्ता पथक गुन्हे शाखा नवी मुंबई यांच्यावतीने सायबर गुन्हेगारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रो. डॉ. राजेश्री घोरपडे उपस्थित होत्या.सहायक पोलीस निरीक्षक श्रीनिवास तुंगेनवार यांनी दैनंदिन जीवनात सातत्याने होणाऱ्या आर्थिक फसवणुकीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध क्षेत्रात होणारी ऑनलाईन फसवणूक व ग्राहकांचे होणारे नुकसान विविध उदाहरणांच्या माधमातून विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. तसेच भविष्यकाळात आपली आर्थिक फसवणूक होऊ नये. यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे. यावरही भाष्य केले. कुठल्याही एजन्सीला माहिती देताना आपले आधारकार्ड, खातेनंबर व ओटीपी नंबर देता कामा नये. तसेच अमिषाला किंवा लोभाला बळी पडता कामा नये. कोणताही ऑनलाईन व्यवहार करताना खूप काळजी घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस विभागातील रवींद्र वंजारी यांनी केले तर उपस्थितांचे आभार लेफ्टनंट सारंग भागवत यांनी मानले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व विद्यार्थी व युनिटप्रमुख प्रा.नितीन गमरे उपस्थित होते.



पनवेल महानगर पालिका निवडणुकीत कळंबोली मतदार संघात मतदारात उत्साह,मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदारांची मोठी गर्दी

# रक्तदान आणि अन्नदान हे पुण्याचे काम–महेंद्रशेठ घरत

## साई मंदिरात महेंद्रशेठ घरत यांनी केले रक्तदान!

**उरण । प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी महेंद्रशेठ घरत यांनी रक्तदान केले. साई मंदिरात अन्नदान आणि रक्तदान हा दुग्धशर्करा योग साधणारे महेंद्रशेठ घरत हे राजकीय आणि सामाजिक समतोल साधणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. हे त्यांनी आज केलेल्या रक्तदानातून दाखवून दिले. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले', असे म्हणतात ते महेंद्रशेठ घरत यांना तंतोतंत लागू होते. त्यांनी साई मंदिरात रक्तदान शिबिरात मार्गदर्शन केले. ते म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मी गेली अनेक रक्तदान करतोय. अनेकांचे जीव त्यामुळे वाचतात. त्यामुळे रक्तदान आणि अन्नदानासारखे पुण्य नाही. त्यामुळे मी आज दोन्ही



गोष्टी एकाच वेळी करतोय. यात मला आनंद आहे. साई मंदिराच्या व्यासपीठावर अनेक समाजोपयोगी उपक्रम आणि कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध होत आहे. ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे.


श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या अनुयायांनी वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी साई मंदिर वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील यांनी महेंद्रशेठ घरत यांचे स्वागत केले आणि रक्तदान केल्याबद्दल अभिनंदन केले.

# खडकी गणात विठ्ठल मोघे यांची उमेदवारी ठरणार 'गेम चेंजर'; आमदार राहुल कुल कोणावर विश्वास टाकणार?

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्याच्या राजकारणाचे केंद्रबिंदू असलेल्या पंचायत समिती निवडणुकीचे पडघम आता स्पष्टपणे वाजू लागले आहेत. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, आमदार राहुल कुल यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या खडकी गणाकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. यंदा हा गण अनुसूचित जातीसाठी (डउ) आरक्षित झाल्याने नव्या आणि प्रभावी उमेदवारांच्या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर वकील व निर्भीड पत्रकार विठ्ठल भाऊसाहेब मोघे यांची उमेदवारी अत्यंत प्रबळ मानली जात असून, त्यांच्या नावाने खडकी गणात राजकीय वातावरण तापू लागले आहे.

विठ्ठल मोघे यांची ओळख केवळ राजकीय कार्यकर्ता म्हणून मर्यादित नसून, ते एक अभ्यासू वकील आणि सामाजिक भान असलेले पत्रकार म्हणूनही परिचित आहेत. गेल्या १५ वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी सामान्य जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने केले आहे. मलठण, वाटलूज, नायगाव, राजेगाव,



खाणवटे व स्वामी चिंचोली या गावांमध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क असून, सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक प्रतिमा आहे.

खडकी गण हा पारंपरिकरित्या आमदार राहुल कुल यांच्यासाठी 'प्लस पॉईंट' ठरलेला गण आहे. विठ्ठल मोघे यांनीही नेहमीच आमदार कुल यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला असून,

आमदार राहुल कुल यांनी संधी दिली, तर पूर्ण ताकदीनिशी निवडणूक लढवून हा गड त्यांच्या पदरात टाकू, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

पक्षाच्या धोरणानुसार संस्थात्मक अनुभव, प्रभावी जनसंपर्क आणि सामाजिक स्वीकारार्हता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाण्याची शक्यता असून, या सर्व निकषांमध्ये विठ्ठल मोघे चपखल बसतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

या गणात उमेदवारांची संख्या मर्यादित असली, तरी मोघे यांची जमेची बाजू म्हणजे सर्व समाजघटकांतून मिळणारा पाठिंबा. वकिली व्यवसायामुळे त्यांना कायदेशीर व प्रशासकीय ज्ञान लाभले असून, पत्रकारितेमुळे स्थानिक प्रश्नांची सखोल जाण आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ आरक्षणापुरती मर्यादित न राहता 'विकास विरुद्ध प्रस्थापित' अशी रंगण्याची चिन्हे आहेत.

विठ्ठल मोघे यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहणार असून, आता आमदार राहुल कुल खडकी गणासाठी त्यांच्या नावाला हिरवा कंदील दाखवतात का, याकडे संपूर्ण दौंड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मा.उपसभापती उत्तम आटोळे,यांना सर्वाधिक पसंती,माजी आमदार रमेश थोरात यांचा अनुभवी सारथी मैदान गाजवणार?

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजताच दौंड पंचायत समितीच्या कुरकुंभ गणात राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवारांनी गावोगावी जाऊन गाठी–भेटींचा सपाटा सुरू केला असून, या पार्श्वभूमीवर आपला माणूस म्हणून ओळख असलेले माजी उपसभापती उत्तम आटोळे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.गोरगरिबांच्या सुख–दुःखात धावून जाणारे, मनमिळावू स्वभावाचे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न तत्काळ सोडवणारे नेतृत्व म्हणून उत्तम आटोळे यांची ओळख आहे. माजी आमदार रमेश थोरात यांचे कट्टर समर्थक आणि अजातशत्रू अशी प्रतिमा असलेल्या आटोळे यांनी कुरकुंभ गणातून निवडणूक लढवावी, अशी जोरदार मागणी मतदार व कार्यकर्त्यांकडून होत आहे. कार्यकर्तेही त्यांच्या उमेदवारीसाठी सक्रियपणे कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे.याबाबत स्वतः उत्तम आटोळे यांनीही कुरकुंभ गणातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याचे संकेत दिल्याने रावणगाव व नांदादेवी परिसरात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



आटोळे यांनी स्वतःसह त्यांच्या कुटुंबानेही विविध लोकप्रतिनिधी पदांवर प्रभावी काम केले आहे. दौंड पंचायत समितीचे उपसभापती पद, त्यांच्या पत्नी शोभाताई आटोळे यांचे पुणे जिल्हा परिषद सदस्य म्हणून कार्य, तसेच सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष अशी अनेक जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या आहेत.

सन २००० पासून दौंड तालुक्यात सक्रिय राजकारणात कार्यरत असलेले उत्तम (आप्पा) आटोळे हे अनुभवी आणि विश्वासार्ह सारथी म्हणून ओळखले जातात. तालुक्यात त्यांना वैयक्तिक मानणारा मोठा वर्ग असून जवळपास प्रत्येक गावात त्यांची ओळख आणि संपर्क आहे. रावणगाव व नांदादेवी या दोन गावांवर त्यांची भक्कम राजकीय पकड आजही कायम असून, अनेक अडचणींवर मात करत त्यांनी या गावांची सत्ता आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळवले आहे.

याच पार्श्वभूमीवर कुरकुंभ गणातून आटोळे यांची उमेदवारी जाहीर झाल्यास निवडणूक लढवणे त्यांच्यासाठी सोपे ठरेल आणि विजय निश्चित आहे, असे मत कुरकुंभ गणातील मतदार खुलेपणाने व्यक्त करू लागले आहेत. आता त्यांच्या अधिकृत निर्णयाकडे संपूर्ण गणाचे लक्ष लागले असून, आगामी निवडणुकीत कुरकुंभ गणाचे राजकीय चित्र बदलण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५